# **अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०४ / २०१२.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०६ / ०९ /२०१२.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०४ , शुक्रवार दिनांक १४ / ०९ /२०१२.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक १४ / ०९ / २०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** माळीवाडा येथील जुने महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी
३. मागील सभा क्रमांक ०१ दिनांक २६/०५/२०१२ व
सभा क्रमांक ०२ दिनांक ११/०७/२०१२ रोजीचे इतिवृत्त.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०४ शुक्रवार दिनांक १४/०९/२०१२ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १६ | मागील सभा क्रमांक०१ दिनांक २६/०५/२०१२ व सभा क्रमांक ०२ दिनांक ११/०७/२०१२ रोजीचे सभांचे इतिवृत्त कायम करणे. |
| १७ | दुखवट्याचा प्रस्ताव. |
| १८ | मागासक्षेत्र अनुदान विकास निधी कार्यक्रम (सन २०१२-१३ ) अंतर्गत प्रस्तावीत करण्यात आलेल्या विकास आराखडयास मंजूरी मिळणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १९ | मागासवर्गीय अनुशेषांतर्गत व अपंग अनुशेषांतर्गत वैद्यकीय अधिकारी दोन रिक्त पदे एकत्रित वेतनावर भरण्या बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २० | नविन प्रशासकीय इमारतीतील सभागृहास " राजमाता जिजाउ सभागृह " असे नांव देणे बाबत मा.श्री.दिलीप सातपुते यांची दिनांक १०/०५/२०१२, मा.श्री.शिवाजी बाळासाहेब लोंढे यांची दिनांक ०९/०७/२०१२ व मा.श्री.संभाजी अशोकराव कदम यांची दिनांक ०९/०७/२०१२ रोजीच्या याद्या व त्यावर ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | अहमदनगर शहरातील आगरकर मळा सर्व्हे नंबर ७६/२/अ-१ चाहुराणा बुद्रुक येथील होणा-या उद्यानास स्व.मिनाताई ठाकरे उद्यान असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेवक श्री.दिलीप सातपुते, श्री.नितीन जगताप, श्री. संभाजी कदम यांचे दिनांक ०६/०७/२०१२ व ०९/०७/२०१२ रोजीच्या याद्या व त्यावर ऑफिस रिपोर्ट. |
| २२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील आगरकर मळा एकता कॉलनीतील चाहुराणा बु.सर्व्हे नंबर ७७/१ मधील सांस्कृतिक भवनास "सुर्यभान वहाडणे पाटील" सभागृह तसेच उद्यानास " प्रमोद महाजन उद्यान" व वाचनालयास "श्री गुरु सार्वजनिक वाचनालय" असे नाव देणे बाबत मा.श्री.सचिन सुभाषचंद्र पारखी यांचे दिनांक ०७/०३/२०१२ रोजीची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट. |
| २३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव आदर्शनगर मधील ओपन स्पेसमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहाचे " शहीद जवान मेजर जावेद बकाली सभागृह " असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेवक श्री.शिवाजी लोंढे यांची दिनांक ०४/०४/२०१२ ची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट. |
| २४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव गजाननगर लोंढे मळा मधील ओपन स्पेस मध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहाचे " शाहू फुले आंबेडकर सभागृह " असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेवक श्री.शिवाजी लोंढे यांची दिनांक ०४/०४/२०१२ रोजीची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट. |
| २५ | अहमदनगर महानगरपालिकेचे ठेकेदार श्री.शेख महेबुब अमीर यांची तीन वर्षाची टेंडरची मुदत संपल्याने त्यांनी भरलेले सुरक्षा अनामत रक्कम रु.१०,०००/- परत मिळणे बाबत... |
| २६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो‌ा, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०६ / ०९ /२०१२.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १६** **दिनांक : १४/०९/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** मागील सभा क्रमांक०१ दिनांक २६/०५/२०१२ व सभा क्रमांक ०२ दिनांक ११/०७/२०१२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** मागील सभा क्रमांक ०१ दि.२६/०५/२०१२ व सभा क्रमांक ०२ दिनांक ११/०७/२०१२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

**चर्चा :-**

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** विषयाला सुरूवात करण्यापुर्वी नगरकराच्या जिव्हाळयाचा विषयाबाबत पुरातत्व खात्याचे नियमानुसार किती मीटर पर्यंत बांधकाम परवानगी देता येते.

**मा.श्री.संभाजी कदम :-** मध्यमवर्गीय जनतेच्या दृष्टीने स्वतःची प्रॉपर्टी कशी वाचवता येईल हे पाहणे गरजेचे आहे.

**श्री.दहे नगररचनाकार :-** पुरातत्व खात्या मार्फत घोषीत केलेल्या वास्तू पासून १०० मीटरच्या आतील बांधकामास परवानगी त्यांची हवी असते परवानगी साठी पहिल्या १०० मीटर साठी दिल्लीला, २०० मीटर पर्यत विभागीय कार्यालय औरंगाबाद हे परवानगी देतात हा मार्च २०११ पासून नियम लागू झाला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हवाई अंतर मोजायला काय साधन आहे.

**श्री.दहे नगररचनाकार :-** नकाशाच्या आधारे मोजतो. हवाई अंतर मोजू शकत नाही.

**मा.श्री.संभाजी कदम :-** २०११ नंतर किती बांधकामांना परवानगी दिली ती कशाच्या आधारे दिली. शिशु संगोपन शाळेस परवानगी दिली ती किती मीटर आत आहे.

**श्री. दहे नगररचनाकार :-** शाळेने दिल्लीवरुन परवानगी आणली आहे. नियमानुसार ४० परवानग्या देण्यांत आलेल्या आहेत.

**मा.आयुक्त :-** बेग पटांगण ही जागा ॲक्वीझीशन करुनच घेतली आहे. मी स्वतः औरंगाबाद येथील कार्यालयात जावुन रिलॅक्शेशन बाबत चर्चा केली. त्या ऑफिसमध्ये आम्हाला जी.आर. दाखविण्यांत आला. केंद्र शासनाच्या कायद्यातील तरतूदीनुसार काही वास्तू नोटीफाईड नक्की केल्या आहेत. परवानगी मिळत नाही अशातला भाग नाही त्यांना पटवुन द्यावे लागते. पूर्वी सुध्दा कंडीशन टाकून परवानगी देत होतो. आता तसे करता येणार नाही अन्यथा अधिका-यांवर कारवाई करण्यांत येईल असे सांगण्यात आले. ज्या वास्तू नोटीफाईड आहेत त्या पब्लीश करु ना-हरकत असल्याशिवाय परवानगी देता येणार नाही तशा पध्दतीचा प्रस्ताव तयार केलेला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पुरातत्व खात्याचे अधिकारी अहमदनगर येथे नेमण्यांत यावेत. महानगरपालिकेचा एखादा अधिकारी यांचेवर जबाबदारी देण्यांत यावी. जेणेकरुन नागरीकांना परवानगी साठी इतरत्र जावे लागणार नाही.

**मा.आयुक्त सो :-** माझ्याकडुन सेंट्रल गव्हर्नमेंटला मी आदेश देवु शकत नाही. शिशु संगोपनच्या आधारे इतरांना परवानगी देता येणार नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शहरातील मिळकती जुन्या झाल्या आहेत त्या पडल्यास जिवीत हानी होवू शकते. याची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

**मा.आयुक्त साो :-** या चर्चेच्या अनुषंगाने ठराव दिल्यास आपण प्रस्ताव पाठवू.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** पुढच्या सर्वसाधारण सभेत विषय घेण्यात यावा. इतिवृत्त कायम करावे.

**मा.श्री. अशोक बडे :-** इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

**मा.महापौर साो :-** आपले जे निवेदन येईल त्यानुसार पुढील बोर्डात विषय घेवू. इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :-**

मागील सभा क्रमांक ०१ दिनांक २६/०५/२०१२ व सभा क्रमांक ०२ दिनांक ११/०७/२०१२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.अशोक किसन बडे

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १७** **दिनांक : १४ /०९ /२०१२**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | जीवन विद्या प्रकाशनचे संस्थापक सद्‌गुरु वामन पै. यांचे बुधवार दिनांक ३०/०५/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | अहमदनगर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वेदप्रकाश त्रिपाठी यांचे बुधवार दिनांक ३०/०५/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | अकोले येथील आदर्श शिक्षक व वृक्षमित्र भाउराव दगडू आवारी यांचे रविवार दिनांक १०/०६/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | हिंदी गझल सम्राट उस्ताद मेहंदी हसन खॉं यांचे गुरुवार दिनांक १४/०६/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे मा.अध्यक्ष श्री.गोपाळराव कोल्हेपाटील यांचे रविवार दिनांक १७/०६/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ६ | कॉंग्रेस कार्यकर्ते श्री.अशोक मोरे यांचे रविवार दिनांक ०१/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | अहमदनगर शहरातील जैन समाजाचे सामाजिक कार्यकर्ते भाईलाल शहा यांचे शुक्रवार दिनांक ०६/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | पाथर्डी येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड.रमेश गांधी यांचे सोमवार दिनांक ०९/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ९ | नगर शहरातील व जिल्ह्यातील वारकरी संप्रदायाचे कार्यकर्ते नाना महाराज वनकुटे यांचे शनिवार दिनांक १४/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १० | हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रख्यात सुपरस्टार राजेश खन्ना यांचे बुधवार दिनांक १८/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ११ | औरंगाबाद येथील सामाजिक कार्यकर्ते श्रीमती मिनादेवी दर्डा यांचे गुरुवार दिनांक २०/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १२ | नगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते व चहाचे व्यापारी नंदकिशोर सोनी यांचे गुरुवार दिनांक २०/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १३ | अहमदनगर येथील सामाजिक कार्यकर्त्या शांताबाई कर्नावट यांचे गुरुवार दिनांक २०/०७/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |

| | |
|---|---|
| १४ | नगर शहरातील पत्रकार नंदकुमार शिंदे यांचे शुक्रवार दिनांक १०/०८/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १५ | महाराष्ट्र शासनाचे मा.आरोग्य मंत्री दिग्विजय खानविलकर यांचे शुक्रवार दिनांक १०/०८/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १६ | लिंगायत गवळी समाजाचे सामाजिक कार्यकर्ते व प्रसिध्द पैलवान चिमाप्पा देवबा चवंडके यांचे शनिवार दिनांक ११/०८/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १७ | महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री व कॉग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते नामदार विलासरावजी देशमुख यांचे रविवार दिनांक १४/०८/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १८ | माजी खासदार श्रीमती मृणाल गोरे यांचे शनिवार दिनांक १८/०८/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १९ | हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते ए.के.हंगल यांचे सोमवार दिनांक २७/०८/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १८** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मागासक्षेत्र अनुदान विकास निधी कार्यक्रम (सन २०१२-१३ ) अंतर्गत प्रस्तावीत करण्यात आलेल्या विकास आराखडयास मंजूरी मिळणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.जिल्हा प्रकल्प अधिकारी, यांचेकडील पत्र क्र.जिग्राविय/बीआरजीएफ (१)/१२१२/१९६/१२ दिनांक १९/०४/२०१२.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, केंद्र शासन पुरस्कृत मागासक्षेत्र अनुदान विकास निधी कार्यक्रम (सन २०१२-१३) अंतर्गत वार्षिक कृती आराखडा सादर करणे बाबत संदर्भीय पत्रान्वये मा.जिल्हा प्रकल्प अधिकारी, अहमदनगर यांनी कळविले आहे. सन २०१२-२०१३ साठी अहमदनगर महानगरपालिकेस रु.२,५१,०३,७०६/- मंजुर झालेले आहे. त्यांनी कळविलेल्या प्रभाग निहाय यादीनुसार व मंजुर केलेल्या रक्कमेनुसार एकुण ६८ विकास कामांचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून सदरचा संपुर्ण प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसह मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांचकडेस सादर करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत प्राथमिक Plan Plus Software मध्ये तयार करुन जा.क्र.सा.बां.१२० दिनांक ०२/०५/२०१२ अन्वये मा.जिल्हाधिकारी अ.नगर यांचेकडेस सादर करण्यात आलेला आहे.

तरी सन २०१२-१३ साठीचा मागास क्षेत्र विकास निधीच्या सन २०१२-१३ च्या विकास आराखडयास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव मा.महासभेपुढे ठेवणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर इनचार्ज अभियंता याचा अभिप्राय की, सन २०१२-१३ साठी मा.केंद्र शासन पुरस्कृत "मागास क्षेत्र अनुदान निधी " (BRGF) अंतर्गत मनपास रक्कम रु.२,५१,०३,७०६/- चा प्रस्ताव तातडीने सादर करणे बाबत कळविलेनुसार मा.नगरसेवक यांनी त्यांचे प्रभागात सन २०१२-१३ करीता सुचविलेल्या विकास कामांचा आराखडा मा.प्रकल्प अधिकारी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अहमदनगर यांचेकडेस जा.क्र.साबांवि १२० दि.०२/०५/२०१२ अन्वये सादर केला आहे. सदर विकास आराखडयास मा.महासभेच्या मंजुरीची आवश्यकता आहे.

तरी सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेस मंजुरी करीता सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.जिल्हा प्रकल्प अधिकारी यांचे दिनांक १९/०४/२०१२ चे पत्रान्वये संबंधित वॉर्ड निहाय प्रस्ताव सत्वर सादर करावयाचा असल्याने दिनांक ०२/०५/२०१२रोजी मा.सदस्यांनी सुचविल्यान्वये रोजी तात्काळ प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु शासकीय नियमान्वये सदर प्रस्तावास मा.महासभेची मान्यता आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे मान्यतेस्तव सादर करणे योग्य.

यावर मुलेप/मुलेअ यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मा.जिल्हा प्रकल्प अधिकारी यांचे दिनांक १९/०४/२०१२ चे पत्राप्रमाणे मागासक्षेत्र अनुदान निधी (BRGF) सन २०१२-१३ च्या विकास आराखडयास मान्यतेकरीता मा.महासभेपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), मुलेप/मुलेअ, शहर अभियंता, इनचार्ज अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** नाले सफाईचा विषय गेल्या महिन्या पासून चर्चेत आहे याविषयी माहिती द्या.

**मा.आयुक्त साो :-** सभापती शिक्षण मंडळ यांनी १० दिवसापुर्वी तक्रारी अर्ज दिला आहे. मंजूर टेंडर प्रोसेस मधील तक्रारी आहेत सोबत एक व्हीडीओ क्लीप दिली आहे. प्राथमिक दृष्टया तक्रार गंभीर आढळल्याने १० दिवसात मुख्यलेखापरीक्षक यांनी सत्यता पडताळून पाहणे बाबत आदेश दिले आहेत. पुढच्या मिटींगमध्ये याबाबत अहवाल सादर करणेंत येईल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** घटना कशी घडली याचे वाचन करायला सांगा.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** यापूर्वी कोणत्या विभागा मार्फत काम व्हायचे आज कोणत्या विभागा मार्फत केले जाते. पूर्वीच्या विभागाच्या काही तक्रारी होत्या का ? आपणाला ठोस कार्यवाही करावी लागेल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** ही चौकशी होत असतांना संबंधितांना सस्पेंड करा हे अधिकारी दबाव आणू शकतात मेश्राम साहेब नविन आहेत .

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** बाहेरच्या व्यक्तीची चौकशीचे कामी नेमणूक करा.

**मा.आयुक्त साो :-** टेंडर प्रोसेस बद्दल आरोप आहेत ते सर्व पेपर ताब्यात घेण्याबाबत मी मेश्राम यांना आदेश दिले.

**मा.श्री.संजय गाडे :-** एक क्लीप आहे ती क्लीप सभागृहाला दाखविण्यांत यावी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आज त्यांची बदली करा.

**मा.आयुक्त साो :-** संबंधितांची बदली करु शकतो सस्पेंड करु शकत नाही. जोपर्यंत आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत सस्पेंड करता येणार नाही. आपल्या सूचनेनुसार बदली करु शकतो.

**उपायुक्त (सा) :-** नाले सफाईचा विषय आहे मागील वर्षी नाले सफाई अतिक्रमण विभागामार्फत करण्यांत आली होती. यावर्षीही सीना नदी पात्रातील सफाई करणेकामी १५ लक्ष रुपयांची तरतुद केली आहे. मागील आयुक्त यांनी आरोग्य विभागामार्फत साफ सफाई करणे बाबत आदेश दिले आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** आयुक्त यांनी सदर काम परस्पर कसे ट्रान्सफर केले मा.आयुक्तांना हे अधिकार आहेत का ? बजेट मध्ये एखाद्या विभागाचा निधीची तरतुद केली असतांना इतर विभागाकडे तो कसा वर्ग केला कुठल्या कायद्यानुसार करण्यांत आला याची माहिती देण्यांत यावी.

**मा.आयुक्त साो :-** माझ्याकडे तक्रारी आल्यानंतर ते बील मी थांबवले आहे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** सभागृहात नविन अधिकारी उपस्थित आहेत त्यांची ओळख सभागृहास होणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त साो :-** श्रीमती.दिपा मुधोळ या आठ दिवसांसाठी आय.ए.एस. प्रोबेशनरी ट्रेनिंगसाठी अहमदनगर महानगरपालिकेत आहेत.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** नाले सफाई चालू असतांना कामावर महानगरपालिकेचा वचक आहे किंवा नाही ? संबंधित अधिकारी यांची तिथे फेरी नसते का ? कुणीतरी तक्रार केल्यानंतर प्रशासन जागे होते.

**मा.आयुक्त साो :-** डॉ.पैठणकर हे काम पहातात.

**मा.श्री.संभाजी कदम :-** कॅफो उशीरा येतात ऑफिसमध्ये उपस्थित नसतात अधिका-यांनी अधिकाराचा गैरवापर करु नये.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** कोणाच्या बदल्या करणार ते सांगा.

**मा.आयुक्त साो :-** दोष कोणाचा आहे, आत्ताच त्यावर निष्कर्ष काढु शकत नाही. श्री.सतिष धाडगे यांनी ज्यांची तक्रार केली त्यांची चौकशी झाल्याशिवाय कारवाई करता येणार नाही.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** श्री.परशरामी साहेब किंवा श्री.निकम साहेब यांच्याकडे चौकशी सोपवा.

**मा.आयुक्त साो :-** १० दिवसात चौकशीचा अहवाल देण्यांत येईल.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** आरोग्य खात्याकडे ३० ते ३५ कंटेनर बंद का ? उत्तर द्या यास कोणास जबाबदार धरणार.

**मा.श्री.बडे :-** एकच विषय तीन वेळा चर्चेला घेवू नये प्रशासनावर यामुळे वचक रहाणार नाही. रिपोर्टनुसार विषयास मंजूरी घ्यावी

**श्री.पैठणकर :-** २५ कंटेनर उचलण्यासाठी जी वाहने पाहिजे ती न मिळाल्याने कंटेनर ठेवता येत नाही. याकरीता दोन वाहने आलेली आहेत त्याची रजिस्ट्रेशन फी भरणे संदर्भात प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. तो प्रस्ताव श्री.निकम यांचेकडेस दिलेला आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ३० लाखाचे कंटेनर पडुन आहेत. जनतेच्या पैशांचा अपव्यय होतो.

**मा.श्री.संभाजी कदम :-** दोन्ही ऑर्डर बरोबर देता येत नाही का ? वाहने अगोदर की कंटेनर आगोदर घ्यायला पाहिजे ? वाढीव दराने वाहने खरेदी करावी लागली याची जबाबदारी निश्चित करा ?

**श्री.पैठणकर :-** दिनांक ३१ मार्च पुर्वी आपण प्रस्ताव तयार केला परंतु मार्च अखेर वाहने खरेदी कामी धनादेश देवू न शकल्याने वाहनांच्या किमती वाढल्याने नविन दराने वाहने खरेदी करावी लागली.

**मा.श्री.संभाजी कदम :-** ६० हजार रुपये महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.

**मा.सौ.किरण उनवणे :-** मागच्या सभेमध्ये हा विषय उपस्थित झालेला होता.

**मा.आयुक्त साो :-** दुस-या एखाद्या वाहनाने ते कंटेनर त्या त्या ठिकाणी ठेवण्याचे आदेश देतो.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** नविन ट्रॅक्टर ट्रॉली चोरीला गेले त्याची फिर्याद केली का याबाबत माहिती देण्यांत यावी.

**श्री.पैठणकर :-** पोलीस केस केली आहे. बजाज अलायन्स इन्शुरन्स कंपनी मार्फत विम्याची रक्कम आपल्याला मिळणार आहे.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** आपले वॉचमन आहेत का ? वॉचमन डयुटीवर असतांना आवारातुन ट्रॉली कशी चोरी होवू शकते.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** रजिस्ट्रेशन झालेले नाही अशी माहिती आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** यापुढे सरकारी कंपन्यांचा इन्शुरन्स करण्यांत यावा.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** रमाई योजने अंतर्गत घरकुल मंजूर आहेत. परंतु ज्यांचे घरकुल मंजूर झाले आहे ते घरकुलासाठीची विकास भाराची रक्कम संबंधित जमा करु शकत नाहीत. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखिची आहे तरी महानगरपालिकेने हा विकासभार मागासवर्गीय कल्याण निधीत २५ लक्ष निधीची तरतुद करावी. दोन वर्ष ही योजना पुर्ण होण्यासाठी लागणार आहेत. माझा नगरसेवक निधी मी देण्यास तयार आहे. यावर्षी रुपये १२.३० लाख, पुढच्या वर्षी १२.५० लाख रक्कम लागणार आहे.

**मा.आयुक्त साो :-** प्रत्येक कामाच्या मागे रक्कम रु २ लाख अनुदान मिळते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा असणे आवश्यक आहे. गुंठेवारी पध्दतीतील जागा असल्यामुळे बांधकामास मार्जीन सोडता येत नाही, काही जागा कमी क्षेत्राच्या आहेत यामुळे या योजनेचा लाभ काहींना देता येत नाही. याकरीता या योजनेतील अटी शिथील करणे बाबत मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे. अटी शिथील होणे आवश्यक आहे.

नविन बदला संदर्भात कुठल्याही प्रकारची सवलत देण्याची तरतुद नाही. त्यामुळे सवलत देता येत नाही. मा.शासनाच्या नियमाच्या पलिकडे जावुन आपण कार्यवाही करु शकत नाही. समाजकल्याण विभागाकडे या संदर्भात काही निधी असेल त्यातुन निधी मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** प्रस्तावात जी कामे घ्यावयाची राहिली आहेत त्यांचा समावेश करण्यांत यावा.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** मागील वर्षी जी कामे घेण्यांत आली ती सध्या कोणत्या स्टेजला आहेत. केंद्र शासनाचा निधी जर आपण वेळेत खर्च करु शकत नसेल तर नविन तरतुद कशासाठी करावयाची.

**श्री.मगर शहर अभियंता :-** सन २०११-२०१२ एकुण ६१ कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** त्रुटी दुरुस्त करुन जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव गेला का ? तेथुन तो प्रस्ताव का येत नाही ? दुरुस्ती करुन तीन महिने होवुन जर प्रस्तावास मंजूरी येत नसेल याची चौकशी केली का ? याबाबत कोणीही पाठपुरावा करीत नाही, आम्हाला याचा पाठपुरावा करावा लागतो.

**श्री.मगर शहर अभियंता :-** मी स्वतः उद्या या संदर्भात कलेक्टर ऑफिसला भेट देवून माहिती घेतो.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** कोणती कामे घेतली याची यादी मा.सभासदांना दिलेली नाही. यादी वाचुन दाखविण्यांत यावी व त्याची एक प्रत सर्व सभासदांना देण्यांत यावी.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** विषय मंजूर करावा.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** विषय मंजूर करणेत यावा.

--**--

**ठराव :-**

मागासक्षेत्र अनुदान विकास निधी कार्यक्रम (सन २०१२-१३ ) अंतर्गत प्रस्तावीत करण्यात आलेल्या विकास आराखडयास मंजूरी देण्यांत येत आहे. मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव संपूर्ण प्रकरण पाठविणेत यावे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

अनुमोदक : मा.सौ.संगिता रत्नाकर खरमाळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १९** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मागासवर्गीय अनुशेषांतर्गत व अपंग अनुशेषांतर्गत वैद्यकीय अधिकारी दोन रिक्त पदे एकत्रित वेतनावर भरण्या बाबत ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

आदेशित केल्यानुसार इकडील जा.क्र.आस्था.३७६६ दिनांक १७/२/२०११ अन्वये मा.सचिव (२) नगर विकास विभाग, मुंबई. यांचेकडे मा.महासभेने ठराव क्र.०६ दि.२२/६/२०१० अन्वये मंजुरी दिल्यानुसार मनपा मध्ये एकत्रित वेतनावर पदे भरणेबाबत चॅप्टर III (३) नुसार मान्यता मिळणेकामी पुनश्च: पत्र पाठविण्यात आलेले आहे.

वर्ग ३ व वर्ग ४ मधील (लिपीक, शिपाई, बिगारी व तत्सम) ही पदे अतिरिक्त असल्यामुळे सदर पदांची भरती करणे उचित नाही. तथापी मेकॅनिकल इंजिनियर यांच्या वेळोवेळीच्या प्रस्तावानुसार पाणी पुरवठा विभागाकडे कर्मचा-यांची कमतरता भासत असल्याने वर्ग ४ मधील महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा विभागाकडे वर्ग झालेले केवळ मजूर हि पदे भरणे संयुक्तिक वाटते. त्यामुळे जाहिरातीत मजूर या पदांचा समावेश करण्यात आलेला आहे.

तसेच सोबत जोडलेले परीशिष्ट 'अ' मधील रिक्त पदांची तत्कालिन नगरपरिषदेच्या रेफ. (आय.टी.) २,३ व ४/९३ नुसार शैक्षणिक पात्रता पाहता त्यामध्ये ब-याच उणिवा दिसून येतात. त्यामुळे त्यास अनुसरुन जाहिरात प्रसिध्द केल्यास त्यास अल्पसा प्रतिसाद मिळून बहुतांशी पदे परत रिक्त राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे परीशिष्ट 'ब' मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रारुप सेवाप्रवेश नियमा नुसार शैक्षणिक पात्रता ग्राह्य धरुन जाहिरात प्रसिध्द करणे उचित वाटते. (तुलनात्मक तक्ता परीशिष्ट 'क' सोबत जोडलेला आहे.)

तरी सोबत जोडलेल्या तक्त्यातील रिक्त पदे त्यांच्या समोर दर्शविल्यानुसार आरक्षण, शॅक्षणिक पात्रता व एकत्रित वेतनावर भरणेकामी दॅनिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्याबरोबरच सर्व सेवायोजन मार्गदर्शन केंद्राकडून पात्र उमेदवारांच्या याद्या मागविण्याबरोबरच शासन परिपत्रक दि.९ जानेवारी २००६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in व शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या http://ese.mah.nic.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर (वेब साईटवर) प्रसिध्दीस देणेकामी आदेश होणेस विनंती आहे. तसेच येणा-या खर्चास मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मा.शासनाच्या मान्यतेस अधिन राहुन सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता नमुद करुन एकत्रीत वेतनावर नेमणुक करणेसाठी प्रस्तावाप्रमाणे जाहीरात देणे योग्य होईल सबब आदेशार्थ.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर दि.१२/७/२०११ रोजी फेरसादर रिपोर्ट --

प्रस्तावात नमुद केल्यानुसार एकत्रित वेतनावर सोबतच्या परीशिष्टात नमुद केलेली रिक्त पदे भरणे संयुक्तिक आहे. तसेच मा.महासभा ठराव क्र.७ दिनांक २२/६/२०१० अन्वये मा.महापौर साो. यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने सुचविलेल्या शिफारशीसह प्रारुप सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध इकडील जा,क्र.आस्था.१४६ दि.१८/४/२०११ अन्वये अखेर मंजुरीसाठी मा. शासनाकडे पाठविण्यत आलेला आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण १००७ / सं.क्र.६५७ / नवि-२४ / २६, दिनांक : २६ सप्टेंबर २००७ च्या पत्रान्वये "सर्व महानगरपालिकांसाठी आदर्श सेवाप्रवेश नियम तयार करण्यची कार्यवाही सुरु असल्याने व या प्रक्रीयेस मंजूरीसाठी काही काळ लागणार असल्याने महासभेने मान्यता दिलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार विहित पध्दतीचा अवलंब करुन व आरक्षण बिंदू नामावलीनूसार मंजूर पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही त्वरीत सुरु करावी, पदे भरतांना शासन मान्य करेल अशा सेवा प्रवेश नियमातील अर्हता प्राप्त केलेल्या अटीस अधीन राहून नियुक्ती केली जाईल, असे स्पष्ट करावे." असे कळविलेले आहे.

सदरचे पत्र पाहता अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रारुप सेवाप्रवेश नियमास मा.महासभेची मान्यता मिळालेली असल्याने व सद्यस्थितीत मा.शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला असल्याने सोबतच्या परीशिष्टातील मंजुर रिक्त पदे प्रारुप सेवाप्रवेश नियमातील अर्हतेनुसार भरणे संयुक्तिक होईल, तसेच "जाहिरातीतील अर्हतेस मा.शासनाच्या मंजुरीस अधीन राहून" अशी अट जाहिरातीत नमुद करणे आवश्यक आहे, तथापी मंजुरी मिळणेस विनंती आहे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अनुशेषाची पदे किती ?

यावर दि.२९/८/२०११ रोजी फेरसादर रिपोर्ट --

फेरसादर करण्यात येते कि, दि.२४-८-२०११ रोजी नाशिक महानगरपालिका येथे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये अनु.जाती व अनु.जमातीचा संपुर्ण अनुशेष पुर्ण करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

तसेच मा.शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी- २०११/ प्र.क्र.८६ / २०११ / १६-ब, दिनांक :०२ ऑगस्ट २०११ च्या शासन निर्णयान्वये "गट 'अ' ते गट 'ड' च्या पदांमधील सरळसेवा भरती व पदोन्नती यामधील अनुशेष मार्च २०१२ पर्यंत भरण्याची कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिका-यांनी करावी, याप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहिल." असे निर्देश दिलेले आहेत.

तरी सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेले खुल्या प्रवर्गातील कंपौंडर-१ पद, ट्रेसर-२ पदे, व असि.मेकॅनिक-१ पद अशी एकूण ४ पदे वगळून उर्वरीत मागासवर्गीय अनुशेषाची सात (७) रिक्त पदे प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे विहीत पध्दतीनुसार भरणेस मान्यता मिळावी, हि विनंती.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर दि.२६/९/२०११ रोजी फेरसादर रिपोर्ट --

अहमदनगर महानगरपालिकेतील प्रस्तावित रिक्त पदांची भरती करणेकामी मान्यता मिळालेली आहे. परंतु नुकतेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने भरतीबाबतचे माहिती पत्रक इकडेस सादर केलेले असुन अहमदनगर महानगरपालिकेतील सरळसेवेने भरावयाच्या पदांची भरती प्रक्रीया त्यांचेमार्फत करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. तसेच त्यांनी माहिती पत्रकाबरोबर प्रपत्र अ ते ड मध्ये सविस्तर माहिती सादर केलेली आहे, ती येणेप्रमाणे,-

**प्रपत्र अ** :- आज अखेर पर्यंत एकूण २८ विविध शासकीय / निमशासकीय कार्यालयातील रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविली असून राजस्थान सरकारच्या व्यवसायिक कर कार्यालयाची भरती प्रक्रीये बाबतची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**<u>प्रपत्र ब</u>** :- लेखी परिक्षेपुर्वी, लेखी परिक्षेबाबत व लेखी परिक्षेनंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत माहिती सादर केलेली आहे.

**<u>प्रपत्र क</u>** :- प्रथम रिक्त पदांची आरक्षण व समांतर आरक्षणसहीत माहिती घेऊन त्याआधारे सॉफ्टवेअर व संकेत स्थळ तयार केले जाईल, त्यानुसार जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन अर्ज मागविण्यात येईल, अर्जाची विक्री MKCL मार्फत करण्यात येईल. लेखी परिक्षेचे उत्तर पत्रिकांचे नमुने तयार करुन देणे, लेखी परिक्षेनंतरची मुलाखती पर्यंतची सर्व कार्यवाही करणे.

**<u>प्रपत्र ड</u>** :- जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जानुसार प्रती अर्जामागे किमान रु.२२५/- (अक्षरी रुपये दोनशे पंचवीस मात्र) इतके शुल्क MKCL मनपा कडून आकारणार आहे.

माहितीपत्रकातील वरील सर्व माहिती पाहता संबंधित MKCL आधिका-यां सोबत चर्चा केली असता त्यांनी नुकतेच जुलै २०११ मध्ये मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेसोबत भरती बाबत झालेल्या करारपत्रकाची प्रत इकडेस सादर केली आहे. सदर करारपत्रक पाहता खालील प्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.

| अ. नं. | मनपा मार्फत करण्यात येणार असलेबाबतची कामे | MKCL मार्फत करण्यात येणार असलेबाबतची कामे |
|---|---|---|
| १ | जाहिरात देणे | अर्ज विक्री व स्वीकृती (शुल्कासह) |
| २ | प्रश्नपत्रिका तयार करणे व सेंटर नेमून देणे, बैठक व्यवस्था व परीक्षा घेणे | उत्तर पत्रिका तयार करणे व स्कॅन करणे व संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. |
| ३ | Cut of list व मेरीट लिस्ट | Cut of list व मेरीट लिस्ट |
| ४ | मुलाखत लिस्ट तयार करणे | मुलाखत लिस्ट तयार करणे व संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. |
| ५ | मुलाखत घेणे | |

वरील सर्व प्रक्रीया पाहता भरतीबाबतची महत्वाची कार्यवाही हि मनपा कडून करावी लागणार आहे. तथापि प्रश्नपत्रिका तयार करणे, Cut of list व मेरीट लिस्ट, मुलाखत लिस्ट तयार करणे व संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. याबातची सर्व कार्यवाही MKCL मार्फतच करुन घेणे संयुक्तिक होईल.

तरी MKCL बरोबर चर्चा करुन त्याप्रमाणे करार करुन प्रस्तावित रिक्त पदे MKCL मार्फत भरणे संयुक्तिक होईल, तरी आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा केली मा.जि.अ.कार्यालयाने केलेल्या करारनाम्यानुसार MKCL संस्थेस प्रस्तावित अ प्रमाणेच्या कारणाने/ पध्दतीने देणे योग्य नाही. सबब कामाच्या विभागणीसाठी MKCL च्या प्रतिनिधी सोबत बैठक आयोजित करुन तद्नंतर MKCL व्दारे परिक्षा घेणे बाबतचा निर्णय घेणे योग्य होईल. त्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो यांचा अभिप्राय की, अ, मान्य.

यावर दि.२१/११/२०११ रोजी फेरसादर रिपोर्ट,

विनंती फेरसादर करण्यात येते की, दिनांक ०५/११/२०११ रोजी MKCL च्या प्रतिनीधींशी समक्ष चर्चा करुन MKCL मार्फत संपुर्ण भरती प्रक्रीया राबविणेकामी येणा-या खर्चाबाबत माहिती मागविण्यात आली असता MKCL यांनी इकडेस पत्र देऊन प्रती अर्जास यापुर्वी दिलेल्या रु.२२५/- (अक्षरी रुपये दोनशे पंचवीस फक्त) या रकमेमध्ये बदल करुन संपुर्ण भरती प्रक्रीयेकरीता (मुलाखती सोडून) खालील प्रमाणे दर अपेक्षित असलेबाबत कळविलेले आहे.

| Total No.of Application | Rate per Application per post with result processing |
|---|---|
| १००१ to २००० | रु. ३२५/- |
| २००१ to ५००० | रु.२७५/- |
| ५००१ to २५००० | रु.२६०/- |
| More than २५००० | रु.२५०/- |

उपरोक्त दर पाहता प्रती अर्जा मागे किमान रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) इतका वाढीव दर दिलेला असल्याने सदरचे दर अधिक वाटत असल्याने दरामध्ये बदल (कमी) करणेकामी अंतिमत: पुनश्च: MKCL च्या प्रतिनिधींना चर्चेकामी बोलाविणे उचित वाटते.

तरी आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार सदरील संस्थेस दरासंबंधी चर्चा करण्यास बोलाविणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साो यांचा अभिप्राय की, दिनांक १५/११/२०११ रोजी दुपारी ४.०० वा.

यावर दिनांक ०७/१२/२०११ रोजी फेरसादर की,

सादर करण्यांत येते की, दि.२५/११/२०११ रोजी मा.उपायुक्त (सा) यांचे दालनांत MKCL च्या प्रतिनिधी समवेत चर्चा करण्यांत आली सदर बैइकीत प्रति अर्जास येणा-या खर्चा बाबत माहिती मागविली असता MKCL यांनी दिनांक २९/११/२०११ रोजी पत्र देवुन " रु.२५०/- प्रति अर्ज परीक्षा प्रक्रीयेसह तसेच अर्जाची फी २५/- रुपये आकारण्यात येईल." अशी माहिती दिलेली आहे.

मा.शासनाने अपंग भरतीसाठी व मागासवर्गीय अनुशेष भरतीसाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला असल्याने प्रस्तावित अपंग व मागासवर्गीय अनुशेषाची पदे तात्काळ भरणे आवश्यक आहे.

तरी सदरची पदे MKCL मार्फत भरावी किंवा कसे ? याबाबत आदेश होणेस विनंती आहे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, MKCL मार्फत व मनपा मार्फत केल्या जाणा-या कामांचा अहवालासह सादर करा.

यावर दि.०८/१२/२०११ फेरसादर रिपोर्ट --

सादर करण्यात येते की, अपंग व मागासवर्गीय अनुशेष भरती करणेकामी अहमदनगर महानगरपालिका व MKCL मार्फत करण्यात येणार असलेल्या कामांचा तपशील येणेप्रमाणे,-

| अ. नं. | मनपा मार्फत करण्यात येणार असलेबाबतची कामे | MKCL मार्फत करण्यात येणार असलेबाबतची कामे |
|---|---|---|
| १ | जाहिरात तयार करणे, वर्तमान पत्रात, मनपाच्या संकेत स्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणे. | MKCL च्या संकेत स्थळावर जाहिरातप्रसिध्द करणे. |
| २ | -- | अर्ज विक्री व स्वीकृती (शुल्कासह), पोहोच देणे, छाणनी करणे व मा.शासन निर्णयानुसार लेखी व तोंडी परीक्षेकरीता ठरवून दिलेले शुल्क आकारुन मनपाकडे जमा करणे. |
| ३ | परीक्षेकरीता शाळा / सेंटर उपलब्ध करुन देणे, बैठक व्यवस्था व पर्यवेक्षक पुरविणे. | -- |
| ४ | -- | प्रवेश पत्र देणे, प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका तयार करणे परीक्षा केंद्रावर देणे व स्विकारणे. |
| ५ | -- | आरक्षित जागेनुसार Cut of list तयार करुन प्रसिध्द करणे व मुलाखत पत्रे देणे. |
| ६ | मुलाखत घेणे व मुलाखतीचे मार्क्स MKCL कडे सुपुर्त करणे. | -- |
| ७ | -- | मुलाखतीचे व लेखी परीक्षेचे मार्क्स एकत्रित करुन अंतिम यादी प्रसिध्द करणे. |

वरील प्रमाणे कार्यपध्दती अनुसरुन भरती करावयाची झाल्यास MKCL ला पत्र देऊन भरतीबाबतचा करारनामा मागविणेकामी पत्र देणेस आदेश होणेस विनंती आहे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, १. एकुण अंदाजीत खर्च किती ? २. अंदाजपत्रकीय तरतुद आहे का ?

यावर दि.१४/१२/२०११ फेरसादर रिपोर्ट --

निर्देशित केल्यानुसार सादर करण्यात येते की, भरती प्रक्रीयेमध्ये तुर्त तांत्रिक पदांची भरती करावयाची असल्याने सदर पदासाठी अंदाजे रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच

शासन निर्णय दिनांक १९/१०/२००७ च्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार प्रती अर्जदाराकडून लेखी व तोंडी परीक्षा शुल्क रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) आकारणी होऊन मनपाकडे जमा होणार आहे.

तत्कालिन नगर परिषद व मनपा अस्तित्वात आल्यानंतर अशाप्रकारे भरती करणेची हि पहिलीच वेळ असल्याने याबाबत अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली नाही.

तसेच डॉ.श्री.टेकवाणी, वैद्यकीय अधिकारी हे नुकतेच दिनांक १/११/२०११ रोजीपासुन मनपाच्या सेवेतून निवृत्त झालेले असून व श्री.नामदे, कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक १/११/२०११ रोजी राजीनामा दिल्याने त्यांचे पद रिक्त झाल्याने सदरची दोन्ही रिक्तपदे सदर भरती प्रक्रीये मध्ये समावेश करुन भरणे संयुक्तिक होईल.

त्यानुसार सोबतच्या "परीशिष्ट क १" मध्ये सदर पदांचा समावेश करुन आरक्षण व वेतन यासह सर्व माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

तरी वरील मुद्यांबाबत आदेश होणेस विनंती आहे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की Put up the

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, १. अंदाजित खर्च रु ३ लाख होईल. २. आस्थापना खर्च (नवि नियुक्ती ) या लेखाशिर्षकाखाली रु.११ लाख रुपयांची तरतुद केली असुन सदर लेखाशिर्षकामधुन सदरचा खर्च खर्ची टाकणे उचित वाटते. आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर दि.३१/०१/२०१२ फेरसादर रिपोर्ट --

सोबतच्या "परिशिष्ट क १" मध्ये दर्शविलेल्या पदांची भरती MKCL मार्फत भरणेबाबत मान्यता दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इकडील जा.क्र.३०२२ दि.१६/१/२०१२ अन्वये मा.व्यवस्थापक, MKCL यांना पत्र देवुन आपणाकडून पदे भरण्याची प्रक्रीया सुरु करणे बाबत व त्याप्रमाणे करारनामा लवकरात लवकर तयार करुन देणेबाबत कळविण्यात आले असता MKCL चे प्रतिनिधी यांनी समक्ष भेट देवुन उमेदवारांच्या वयाबाबत व भरती बाबतच्या काही मुद्यांची माहिती मागविलेली आहे. सदर मुद्यांची माहिती MKCL च्या हेड ऑफिसला पाठविल्यास सदर माहितीच्या अनुषंगाने संकेत स्थळ प्रसिध्द करण्यात येवुन करारनामा देखील लवकरात लवकर देणेत येईल असे सांगण्यात आले.

MKCL यांनी दिलेले तक्ते शासन निर्णये / परिपत्रके व उपलब्ध माहितीच्या अनुषंगाने भरु सादर करण्यात येत आहे. तरी सदरची माहिती MKCL यांना पाठविण्यास आदेश होणेस विनंती आहे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर दिनांक १२/०४/२०१२ रोजी फेरसादर रिपोर्ट --

सादर करण्यात येते की, दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात दि.१९/०३/२०१२ रोजी अहमदनगर महानगरपालिकेमार्फ़त मागासवर्गीय अनुशेष/अपंग भरती अंतर्गत जाहिरात देण्यात आलेली आहे. सदर भरती अंतर्गत येणा-या पदांसाठीची लेखी परीक्षा दिनांक १७/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आलेली आहे. तसेच मुलाखतीबाबत MKCL च्या अधिका-यांशी समक्ष चर्चा केली असता उत्तर पत्रिका त्यांच्या मुख्य कार्यालयात म्हणजे पुणे येथे तपासणीसाठी पाठविण्यात येतात व तपासणी नंतर दुस-या दिवशी निकाल प्राप्त होतात, त्यामुळे मुलाखत साधारण निकाल प्राप्त झाल्यानंतर किमान ५ ते ६ दिवसानंतर घेणेबाबत सुचविलेले असल्याने व तसेच मुलाखतीसाठी मा. विशेष समाज कल्याण अधिकारी, मा. सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र तसेच मा. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना समिती सदस्य म्हणून उपस्थित राहणेबाबत कळविणे आवश्यक असल्याने त्यानुसार तारीख व वेळ मिळावे.

तसेच सदर भरती करीता MKCL यांनी दि. १२/०४/२०१२ रोजी दिलेले पत्र पाहता खालील प्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहे.

| अ. नं. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | एकूण प्राप्त अर्ज |
|---|---|---|---|
| १ | स्वच्छता निरीक्षक | १ | ६ |
| २ | परिचारीका | १ | ० |
| ३ | वायरमन | २ | ९ |
| ४ | वाहन चालक | २ | ८ |
| ५ | असिस्टंट मेकॅनिक | १ | २ |
| ६ | वैद्यकिय अधिकारी | २ | ५ |
| ७ | कनिष्ठ अभियंता | १ | ० |
| | **एकूण** | **१०** | **३०** |

वरील उमेदवारांच्या लेखी परीक्षेसाठी बैठकीसाठी जागेची तसेच केंद्र प्रमुख व दोन पर्यवेक्षक व दोन शिपाई कर्मचा-यांची व्यवस्था करुन देणे आवश्यक असल्याने त्याबाबत निर्णय होऊन आदेश व्हावेत, हि विनंती.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्ताव पाहता लेखी परीक्षेसाठी मनपाचे जुने सभागृहात ठेवणे योग्य तसेच कर्मचारी नियुक्ती करणे उचित तथापि आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मान्य.

यावर दि.१७/०७/२०१२ रोजी सादर --

जाहिरातीत नमुद केल्यानुसार दिनांक १७/०४/२०१२ रोजी स.११.०० वा. जुने महानगरपालिका सभागृह येथे लेखी परीक्षा ठेवण्यात आलेली होती. तथापि अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियनने जाहिरातीतील पदांबाबत हरकत घेऊन मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडे औद्योगिक विवाद कलमान्वये मनपाने चेंज नोटीस न देता भरती करत असल्याने हरकत अर्ज दाखल केलेला होता.

सदर अर्जावर मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडे सुनावणी सुरु असल्याने भरती प्रक्रीया स्थगित ठेवण्यात आलेली होती. परंतु मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी दिलेल्या आदेशानुसार अपंगाचा अनुशेष दि.३१ मे पुर्वी पुर्ण करणे आवश्यक असल्याने त्यानुसार मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे सदर जाहिरातीतील वैद्यकीय अधिकारी एक पद (अपंगासाठी राखीव असलेले) भरणे क्रमप्रात असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. त्यानुसार दि.२९/०५/२०१२ रोजीच्या मा.उपसचिव, नगर विकास विभाग यांच्या बैठकीत सादर केलेल्या माहितीत दिनांक ३०/०५/२०१२ रोजी लेखी परीक्षा घेण्यात येणार असून दि. १५ जूलै पुर्वी अनुशेष पुर्ण केला जाईल असे नमुद केले होते.

तथापि मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे सुनावणी दरम्यान स्पष्ट असे निर्णय न झाल्याने दि.३०/०५/२०१२ रोजीची लेखी परीक्षा स्थगित ठेवण्यात आलेली होती. दि.१०/०७/२०१२ रोजी मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे सुनावणी होऊन येणेप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. "सरळसेवा भरतीने २ पदे भरण्याबाबत त्यांची हरकत नसून त्याचबरोबर पदोन्नतीने पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु करावी."

मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडील निर्णय पाहता वैद्यकीय अधिकारी व कनिष्ठ अभियंता हि दोन (२) पदे भरणे आवश्यक आहे. त्यानुसार MKCL यांचे कडून उमेदवारांची माहिती (अर्ज) प्राप्त करुन घेतले

असता वैद्यकीय अधिकारी दोन पदांसाठी एकूण पाच (५) उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले असुन एक (१) उमेदवार अपात्र आहे. तसेच कनिष्ठ अभियंता (विजाभज १ पद) पदासाठी एकही अर्ज दाखल झालेले नसल्याने सदर पदाची पुनश्च: जाहिरात देणे संयुक्तिक होईल.

तसेच दि.१३/०७/२०१२ रोजीच्या मा.उपसचिव, नगर विकास विभाग यांच्या आढावा बैठकीत सादर केलेल्या माहितीत दिनांक ३१/०७/२०१२ पुर्वी अनुशेष पुर्ण केला जाईल असे नमुद करण्यात आलेले आहे.

वैद्यकीय अधिकारी (अपंग १ पद व अनु.जमाती १ पद) पदासाठी प्राप्त उमेदवारांचा छाननी तक्ता या सोबत सादर करण्यात येत असून सदरचा छाननी तक्ता नोटीस बोर्डावर डकविणेस व पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेसंबंधी लेखी पत्रे किमान सात (७) दिवस अगोदर देणे क्रमप्राप्त असल्यामुळे लेखी व तोंडी परीक्षेकरीता तारीख व वेळ देण्यात यावी, जेणेकरुन तत्संबंधी आवश्यक ती प्रक्रीया करुन घेणेकामी MKCL या संस्थेस पत्र देणेस व तसेच लेखी परीक्षेकामी पात्र उमेदवारांची संख्या पाहता लेखी परीक्षा मा.स्थायी समिती सभागृह, नविन प्रशासकीय इमारत येथे घेणे संयुक्तिक वाटते. तसेच मा.प्रभारी सहाय्यक आयुक्त यांना परीक्षा प्रमुख / पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करणेकामी आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित संदर्भात छाननी तक्ता प्रसिध्द करणेस तसेच लेखी व तोंडी परीक्षा दिनांक ३/८ रोजी ठेवणेस तसेच परिखा प्रमुख नेमणूक करणेस हरकत नाही. तथापि मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्यतेनंतरची १० दिवसांची मुदत मिळेल अशा अनुषंगाने तारीख निश्चित करावी म्हणजे सर्व उमेदवारांना पुरेशी सुचना व अवधी मिळेल.

सोबत : छाननी तक्ता

# "परीशिष्ट क १"

| अ. नं. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | प्रारुप सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक पात्रता | वर्ष | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छता निरीक्षक | **१** (अजा) | शासन मान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वच्छता निरीक्षकाची पदविका., एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३५००/-<br>४०००/-<br>४५००/- |
| २ | परिचारीका | **१** (भज ब) | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेची परिक्षा उत्तीर्ण **ब)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका (जी.एन.एम.) **क)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. एससीआयटी किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३५००/-<br>४०००/-<br>४५००/- |
| ३ | वायरमन | **२** (विजाभज-१, इमाव-१) | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाचे शालांत परिक्षा उत्तीर्ण **ब)** शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासनाचे उद्योग उर्जा व कामगार विभाग अनुज्ञापन मंडळ यांचेकडील तारतंत्री परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३०००/-<br>३५००/-<br>४०००/- |
| ४ | वाहन चालक | **२** (अजा-१, अज-१) | किमान माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण जड वाहन चालक परवाना आणि जड वाहन चालविण्याचा किमान दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३०००/-<br>३५००/-<br>४०००/- |
| ५ | असि. मेकॅनिक | **१** अजा | एस.एस.सी.उत्तीर्ण, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा मोटार मेकॅनिक प्रमाणपत्राचा किमान २ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३०००/-<br>३५००/-<br>४०००/- |
| ६ | वैद्यकीय अधिकारी | **३** (अनु. जमाती-१ खुला-२) पैकी १ पद अपंगासाठी | **१.** मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस. उत्तीर्ण. मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**एम. बी. बी. एस. उपलब्ध न झाल्यास**<br>**१.** मान्यता प्राप्त विद्यापिठाची बी.ए.एम. एस. / बी. एच. एम. एस. परिक्षा उत्तीर्ण (मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.) व शासकीय/ निमशासकीय /खासगी रुग्णालयातील संबंधीत विषयाचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**२.** मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | १५०००/-<br>१६०००/-<br>१७०००/- |
| ७ | कनिष्ठ अभियंता | १ (विजाभज) | शासन मान्य विद्यापिठाची बी.ई. सिव्हील (स्थापत्य विषयातील पदवी) आवश्यक. एम. एस. सी. आय. टी. व अनुभवास प्राधान्य | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ४५००/-<br>५०००/-<br>५५००/- |
| | एकूण | ११ | | | |

# परीशिष्ट "क"

| अ. नं. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | प्रारुप सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक पात्रता | वर्ष | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छता निरीक्षक | **१** (अजा) | शासन मान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वच्छता निरीक्षकाची पदविका., एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३५००/-<br>४०००/-<br>४५००/- |
| २ | परिचारीका | **१** (भज ब) | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेची परिक्षा उत्तीर्ण **ब)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका (जी.एन.एम.) **क)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. एससीआयटी किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३५००/-<br>४०००/-<br>४५००/- |
| ३ | वायरमन | **२** (विजाभज-१, इमाव-१) | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाचे शालांत परिक्षा उत्तीर्ण **ब)** शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासनाचे उद्योग उर्जा व कामगार विभाग अनुज्ञापन मंडळ यांचेकडील तारतंत्री परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३०००/-<br>३५००/-<br>४०००/- |
| ४ | वाहन चालक | **२** (अजा-१, अज-१) | किमान माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण जड वाहन चालक परवाना आणि जड वाहन चालविण्याचा किमान दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३०००/-<br>३५००/-<br>४०००/- |
| ५ | असि. मेकॅनिक | **१** अजा | एस.एस.सी.उत्तीर्ण, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा मोटार मेकॅनिक प्रमाणपत्राचा किमान २ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण. | पहिले<br>दुसरे<br>तिसरे | ३०००/-<br>३५००/-<br>४०००/- |
| | एकूण | ७ | | | |

आस्थापना प्रमुख
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## वैद्यकीय अधिकारी (अनु.जमाती-१ पद व अपंग-१ पद) छाननी तक्ता

**आवश्यक शैक्षणिक पात्रता :**

१. मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस. उत्तीर्ण. मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.

**एम.बी.बी.एस. उपलब्ध न झाल्यास**

१. मान्यता प्राप्त विद्यापिठाची बी.ए.एम.एस. / बी.एच.एम.एस. परीक्षा उत्तीर्ण (मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक) व शासकीय / निमशासकीय / खासगी रुग्णालयातील संबंधित विषयाचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

२. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले) नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक.

| अ. नं. | उमेदवाराचे नांव | जन्मदिनांक | वय वर्ष (पुर्ण) | जात / प्रवर्ग | उमेदवार धारण करीत असलेली शैक्षणीक पात्रता | अनुभव | रजिस्ट्रेशन आहे / नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. महाजन उदय शिवदास (अपंग) | ३०-३-६८ | ४४ | लिंगायत | बी. ए. एम एस. (६३.०२%) | आहे | नाही | अपात्र (रजिस्ट्रेशन नाही) |
| २ | डॉ. तुपे दिपमाला उमेश (चव्हाण) | २-६-८५ | २६ | पारधी (अनु.जमाती) | बी. ए. एम एस. (६१%) | आहे | आहे | पात्र |
| ३ | डॉ. सारपाटे सचिन अर्जुन | १५-२-८५ | २७ | महादेव कोळी (अनु.जमाती) | बी. ए. एम एस. उत्तीर्ण एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण (५९.२५%) | आहे | आहे. | पात्र |
| ४ | डॉ.डमाळे ज्योती रावसाहेब | २-५-८९ | २२ | महादेव कोळी (अनु.जमाती) | बी. ए. एम एस. (५७.१५%) | आहे | आहे (ऑगस्ट २०१२ पर्यंत) | पात्र |
| ५ | डॉ. दळवी गिरीश नानासाहेब (अपंग) | १८-२-७३ | ३९ | माळी (इमाप्र) | बी. ए. एम एस. (५५%) | आहे | आहे | पात्र |

# सरळसेवा भरती पहिला टप्पा माहिती पत्रक

| अ. नं. | पदाचे नांव | प्रारुप सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक पात्रता | इतर पात्रता | लेखी/तोंडी परीक्षा फी रोख/डीडी | खुला प्रवर्गासाठी फी | राखीव प्रवर्गासाठी फी | राखीव प्रवर्ग | वर्गवारी (I/II/III/IV) | मुलाखत/ थेट निवड | लेखी परीक्षेसाठी प्रश्न संख्या | गुण (प्रती प्रश्न) | लेखी परीक्षेचे एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी Medical Officer | **१.** मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस. उत्तीर्ण. मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**एम. बी. बी. एस. उपलब्ध न झाल्यास**<br>१. मान्यता प्राप्त विद्यापिठाची बी.ए.एम.एस. / बी. एच. एम. एस. परिक्षा उत्तीर्ण (मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.) व शासकीय/ निमशासकीय /खासगी रुग्णालयातील संबंधीत विषयाचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**२.** मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | अनुभव असल्यास प्राधान्य | **रोख** | **२००/-** | **१००/-** | **अनु. जमाती व खुला (ST & Open)** | **II** | **मुलाखत** | **१०० प्रश्न** | **२ गुण** | **२०० गुण** |
| २ | कनिष्ठ अभियंता Jr.Engineer | शासन मान्य विद्यापिठाची बी.ई. सिव्हील (स्थापत्य विषयातील पदवी) आवश्यक. एम. एस. सी. आय. टी. व अनुभवास प्राधान्य | अनुभव असल्यास प्राधान्य | **रोख** | **२००/-** | **१००/-** | **विजाभज (VJNT)** | **II** | **मुलाखत** | **१०० प्रश्न** | **२ गुण** | **२०० गुण** |
| ३ | स्वच्छता निरीक्षक Sanitary Inspector | शासन मान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वच्छता निरीक्षकाची पदविका., एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | अनुभव असल्यास प्राधान्य | **रोख** | **२००/-** | **१००/-** | **अनु. जाती (SC)** | **III** | **मुलाखत** | **१०० प्रश्न** | **२ गुण** | **२०० गुण** |
| **अ. नं.** | **पदाचे नांव** | **प्रारुप सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक पात्रता** | **इतर पात्रता** | **लेखी/तोंडी परीक्षा फी रोख/डीडी** | **खुला प्रवर्गासाठी फी** | **राखीव प्रवर्गासाठी फी** | **राखीव प्रवर्ग** | **वर्गवारी (I/II/III/IV)** | **मुलाखत/ थेट निवड** | **लेखी परीक्षेसाठी प्रश्न संख्या** | **गुण (प्रती प्रश्न)** | **लेखी परीक्षेचे एकूण गुण** |
| ४ | परिचारीका Nurse | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेची परिक्षा उत्तीर्ण<br>**ब)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व | अनुभव असल्यास प्राधान्य | **रोख** | **२००/-** | **१००/-** | **भज (ब) (NT-B)** | **III** | **मुलाखत** | **१०० प्रश्न** | **२ गुण** | **२०० गुण** |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मिडवाईफरी या विषयाची पदविका (जी.एन.एम.) **क)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. एससीआयटी किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक. | | | | | | | | | | |
| ५ | वायरमन Wireman | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाचे शालांत परिक्षा उत्तीर्ण **ब)** शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासनाचे उद्योग उर्जा व कामगार विभाग अनुज्ञापन मंडळ यांचेकडील तारतंत्री परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक. | अनुभव असल्यास प्राधान्य | **रोख** | **२००/-** | **१००/-** | **विजा (अ) व इमाव (VJ (A) & OBC)** | **III** | **मुलाखत** | **१०० प्रश्न** | **२ गुण** | **२०० गुण** |
| ६ | वाहन चालक Driver | किमान माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण जड वाहन चालक परवाना आणि जड वाहन चालविण्याचा किमान दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | अनुभव असल्यास प्राधान्य | **रोख** | **२००/-** | **१००/-** | **अनु. जाती व अनु. जमाती (SC& ST)** | **III** | **मुलाखत** | **१०० प्रश्न** | **२ गुण** | **२०० गुण** |
| ७ | असि. मेकॅनिक Asst. Mechanic | एस.एस.सी.उत्तीर्ण, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा मोटार मेकॅनिक प्रमाणपत्राचा किमान २ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण. | अनुभव असल्यास प्राधान्य | **रोख** | **२००/-** | **१००/-** | **अनु. जाती (SC)** | **III** | **मुलाखत** | **१०० प्रश्न** | **२ गुण** | **२०० गुण** |

आयुक्त
अहमदनगर महानगरपालिका

# दिनांक ०१             २०१२ रोजी विचारात घ्यावयाची वयोमर्यादा

| अ. नं. | प्रवर्ग | खुला (किमान वय) | खुला (कमाल वय) | राखीव प्रवर्गासाठी (किमान वय) | राखीव प्रवर्गासाठी (कमाल वय) |
|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १८ | ३३ | -- | -- |
| २ | राखीव | -- | -- | १८ | ३८ |
| ३ | अपंग | १८ | ४५ | १८ | ४५ |
| ४ | खेळाडू | १८ | ३८ | १८ | ४३ |
| ५ | माजी सैनिक | १८ | ४५ | १८ | ४५ |
| ६ | अंशकालीन | १८ | ४६ | १८ | ४६ |
| ७ | स्वातंत्र्य सैनिक | १८ | ४५ | १८ | ४५ |
| ८ | प्रकल्प ग्रस्त | १८ | ४५ | १८ | ४५ |
| ९ | भूकंप ग्रस्त | १८ | ४५ | १८ | ४५ |
| १० | शासकीय/निमशासकीय/मनपा कर्मचारी | १८ | ३३ | १८ | ३८ |

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

## संवैधानिक पदे  परिशिष्ट "अ"

| अ. नं. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | वेतनश्रेणी | आरक्षण | शैक्षणिक पात्रता | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **प्रस्तावित सेवाप्रवेश नियम** | **मॉडेल सेवाप्रवेश नियम** |
| १ | शहर अभियता | १ | १०६५०-१५८५० | सरळसेवा | **१.** जे महापालिका सेवेत नसतील तर ३३ वर्षाहुन अधिक वयाचे नाहीत.<br>**२.** उमेदवार हा स्थापत्य शास्रातील (बी.ई.सिव्हील) पदवीधारक प्राधान्य.<br>**३.** सरकारी अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत अथवा नावाजलेल्या स्थापत्य शास्र संस्थेत अथवा नावाजलेल्या स्थापत्यशास्र किमान उपअभियंता दर्जाचे पदावर सात वर्षाचा अनुभव आवश्यक. मागासवर्गीय उमेदवारास अनुभव शिथील राहिल. | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>**ब)** एम.ई.(स्ट्रक्चर / रोड अॅण्ड ब्रिजेस / पर्यावरण अभियांत्रिकी / सिव्हील / वॉटर रेसॉरसेस / सिव्हील सॉईल/ सिव्हील कन्स्ट्रक्शन / सिव्हील ट्रान्सपोर्टेशन व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>**क)** राज्य शासनाकडील व महानगरपालिकेकडील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील किमान ०७ वर्षाचा अनुभव. |
| | | | | पदोन्नती | जे स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी धारक असतील आणि उपअभियंता या पदावर किमान सात वर्षाचा अनुभव आहे. | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणा-या महानगरपालिका सेवेतील कार्यकारी अभियंता पदावरील किमान सात वर्षाचा अनुभव |
| | | | | प्रतिनियुक्त | शासकीय सेवेतील योग्य तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर | राज्य शासनाच्या अधिक्षक अभियंता संवर्गातील अधिका-याच्या प्रतिनियुक्तीने. |
| २ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | १ | १००००-१५२०० | सरळसेवा | **१.** जे महापालिका सेवेत नसतील तर ३३ वर्षाहुन अधिक वयाचे नाहीत. एम.बी.बी.एस आणि डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ धारण करणारा मिळत नसेल तर एम.बी.बी.एस. पदवी धारण करणा-या उमेदवारापैकी योग्य त्या उमेदवारास सदरचा डिप्लोमा नेमणुक तारखेपासुन दोन वर्षाच्या मुदतीत पुर्ण केला पाहिजे या अटीवर त्याची नेमणुक करता येईल असे करण्यात तो यशस्वी न झाल्यास नोकरीवरुन काढुन टाकण्यास पात्र राहील.<br>**२.** ज्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत अथवा सहकारी इस्पितळ किंवा नावाजलेल्या इस्पितळामध्ये किमान पाच वर्षाचा वैद्यकीय अधिकारी | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्र शाखेची पदव्युत्तर पदवी [M.D.(P.S.M.)] परीक्षा उत्तीर्ण<br>**ब)** शासन / केंद्र शासन / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहाय्यक आरोग्य अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ७ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.<br>**क)** रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषत: स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मुलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदि बाबींच्या कार्याचा किमान ०७ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणा-या उमेदवारांस प्राधान्य |
| वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदावर वैद्यकीय अधिकारी श्री.बोरगे ए.ए. यांची पदोन्नतीने नियुक्ती | | | | पदोन्नती | **१.** जे एम.बी.बी.एस. पदवी धारण करतात.<br>**२.** जे डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ या परीक्षेचा डिप्लोमा धारण | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणीक अर्हता धारण करणा-या आरोग्य अधिकारी रुग्णालये / |

| अ. नं. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | वेतनश्रेणी | आरक्षण | शैक्षणिक पात्रता | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **प्रस्तावित सेवाप्रवेश नियम** | **मॉडेल सेवाप्रवेश नियम** |
| करणेकामी मा.निवड समितीने ठराव करुन मा. महासभेच्या ठरावान्वये मा. शासनाकडे प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.शासनाने मंजुरी दिलेली आहे. तथापि श्री.बोरगे यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारींचे अवलोकन करता अद्यापपर्यंत पदोन्नतीचे आदेश निर्गमीत केलेले नाही. | | | | | करतात किंवा बढतीच्या तारखेपासुन तीन वर्षाच्या आत ते डिप्लोमा धारण करतील आणि<br>**३.** जे वैद्यकीय अधिकारी म्हणुन सलग किमान ५ वर्षापेक्षा कमी नाहीत एवढ्या कालावधीपासुन कार्यरत आहेत. | आरोग्य अधिकारी प्रतिबंधात्मक उपाय या संवर्गातील किमान ०७ वर्षाचा अनुभव |
| | | | | प्रतिनियुक्त | शासनाकडून आरोग्य सेवेतील पात्र उमेदवार प्रतिनियुक्तीवर | (नामनिर्देशन व पदोन्नतीसाठी योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास ) नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणीक अर्हता व अनुभव धारण करणा-या शासनाकडील योग्य अधिका-याच्या प्रतिनियुक्तीने. |
| ३ | नगर सचिव | १ | ६५००-१०५०० | सरळसेवा | **१)** जे महापालिका सेवेत नसतील तर ३३ वर्षाहून अधिक वयाचे<br>नाहीत.<br>**२)** कला वाणिज्य विज्ञान पदवी अधिक विधी शाखेचे स्नातक<br>**३)** आणि ज्यांना स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय अथवा<br>शासकीय खात्यामधील जबाबदारीच्या जागेवर किमान दहा वर्षाचा<br>अनुभव आवश्यक. | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आणि L.G.S. परीक्षा उत्तीर्ण.<br>**ब)** विधि शाखेच्या पदवीधरास प्राधान्य<br>**किंवा** |
| नगर सचिव पदावर जाहिरात देऊन मनपातील लिपीक कर्मचारी श्री.शित्रे डी.डी. यांची मा.निवड समितीने निवड करुन नियुक्ती देणेकामी मा. महासभेकडे प्रस्ताव सादर केला असता मा. महासभेने याबाबत सविस्तर अहवाल देणेबाबत ठराव संमत केला असता त्यानुसार सविस्तर फेरप्रस्ताव सादर केला असता अद्यापपयंत कुठलेही निर्देश प्राप्त नाही. | | | | पदोन्नती | १) कला वाणिज्य विज्ञान पदवी शाखेचे स्नातक<br>२) आणि अधिक्षक दर्जाच्या जागेवर किंवा तत्सम संवर्ग नोकरीचा १० वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव आवश्यक.<br>३) स्थानिक स्वराज्य संस्थेची पदवी / पदविका परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>४) नगर सचिव या पदावर पदोन्नती देतांना त्यास नगरसचिव विभागातील वरिष्ठ पदावरील ५ वर्षाचा कामाचा अनुभव आवश्यक.<br>५) शासनाने वेळोवेळी मंजुर केलेल्या वेतनश्रेणी सदर पदास लागू राहतील. | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील उपसचिव / सहाय्यक आयुक्त पदाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव. |
| | | | | प्रतिनियुक्त | शासकीय सेवेतील योग्य तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**सरळसेवा रिक्त पदांचा तक्ता**

**परिशिष्ट "ब"**

| अ. नं. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | वेतन बॅण्ड | ग्रेड पे | आरक्षण | रेफ.(आय टी) २,३व४/९३ नुसार आवश्यक शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरोग्याधिकारी | १ | ९३००-३४८०० | ५४०० | खुला | एम.बी.बी.एस., बी.एच.वाय. अगर तत्सम | |
| २ | वैद्यकीय अधिकारी | ३ | ९३००-३४८०० | ५४०० | अज-१, विजाभज-१, खुला-१ | एम.बी.बी.एस., अनुभव | सदर पदांची स्वतंत्र जाहिरात देऊन कार्यवाही करण्यात येत आहे. |
| ३ | सहाय्यक नगर रचनाकार | १ | ९३००-३४८०० | ४४०० | खुला | पात्रता नमुद नाही. | |
| ४ | स्वच्छता निरीक्षक | १ | ९३००-३४८०० | ४३०० | अजा | एस.आय.कोर्स पास | सदरचे पद भरणेबाबत स्वतंत्र प्रस्ताव मान्य झालेला आहे, जाहिरात देणेबाकी आहे. |
| ५ | परिचारीका | १ | ९३००-३४८०० | ४२०० | भज (ब) | बी.पी.एन.ए. | |
| ६ | ट्रेसर | १ | ५२००-२०२०० | २००० | खुला | एस.एस.सी. इंटरमेजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा पास. | |
| ७ | कंपौंडर कम क्लार्क | १ | ५२००-२०२०० | १९०० | अजा | कंपौंडर परीक्षा पास | |
| ८ | वायरमन | २ | ५२००-२०२०० | १९०० | इमाव-१, विजाभज-१ | वायरमन परीक्षा पास | |
| ९ | वाहनचालक | २ | ५२००-२०२०० | १९०० | अजा-१, अज-१ | हेवी व्हेईकल ड्रायव्हींग लायसन्स | |
| १० | वेलफेअर वर्कर पु | १ | ५२००-२०२०० | १९०० | खुला | एस.एस.सी. फॅमिली प्लॅनिंग ट्रेड | |
| ११ | व्हॅक्सीनेटर / देवी डॉक्टर | ३ | ५२००-२०२०० | १९०० | अजा -१, खुला -२ | व्हॅक्सीनेटर कोर्स पास. | |
| १२ | असि. मेकॅनिक | २ | ५२००-२०२०० | १९०० | अजा -१, खुला-१ | आय.टी.आय. मेकॅनिक कोर्स पास. | |
| १३ | कनिष्ठ लिपीक | २० | ५२००-२०२०० | १९०० | अजा-१३, अज -७ | एस.एस.सी. | |
| १४ | सॅनि. वर्क्स शॉप मिस्त्री | १ | ५२००-२०२०० | १९०० | खुला | पात्रता नमुद नाही. | |
| १५ | आया | २ | ४४४०-७४४० | १३०० | अज | ७ वी पास | |
| १६ | शिपाई व तत्सम | २० | ४४४०-७४४० | १३०० | अजा-३,अज-५,विजाअ-३, भजब-२ क-२,ड-२, | ७ वी पास | |

| अ. नं. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | वेतन बॅण्ड | ग्रेड पे | आरक्षण | रेफ.(आय टी) २,३व४/९३ नुसार आवश्यक शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | इमाव-२, खुला-१ | | |
| १७ | बिगारी व तत्सम | ४७ | ४४४०-७४४० | १३०० | अजा-६, अज-१२, विजाअ-६, भजब-४, क-५, ड-३, इमाव-२ खुला-९ | अनुभव | |
| | एकूण | १०९ | | | | | |
| | पान नं. १ वरुन | १०९ | | | | | |
| १८ | माळी (मजिप्रा) | १ | ४४४०-७४४० | १३०० | अजा | पात्रता नमुद नाही. | |
| १९ | मजुर व तत्सम | ४१ | ४४४०-७४४० | १३०० | अज-२, भजब-१, क-१, ड-४, विमाप्र-३ इमाव-१९ खुला-११ | ७ वी पास | |
| २० | शिपाई (३४१) | १ | ४४४०-७४४० | १३०० | अज | ७ वी पास | |
| २१ | क्षेत्र कार्यकर्ता (अनुदानीत) | ८ | ४४४०-७४४० | १३०० | अज-२, विजा अ-१, क-१,इमाव-३ खुला-१ | | सदरची पदे अस्थायी असुन १००% अनुदानीत आहेत. |
| एकूण | | १६० | | | | | |

यावर दि.१३/०८/२०१२ रोजी सादर रिपोर्ट --

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, आज दिनांक १३/०८/२०१२ रोजी वैद्यकीय अधिकारी (अपंग १ पद व अनु.जमाती १ पद) या पदांसाठी पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा स.११.०० वा. ठेवण्यात आलेली होती. सदर लेखी परिक्षेसाठी खालील उमेदवार उपस्थित होते.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | डॉ. चव्हाण दिपमाला बापुजी (तुपे) | अनु. जमाती |
| २ | डॉ. सरपते सचिन अर्जुन | अनु. जमाती |
| ३ | डॉ.डमाळे ज्योती रावसाहेब | अनु. जमाती |
| ४ | डॉ. दळवी गिरीश नानासाहेब | अपंग |

वरिल सर्व उमेदवार हे जाहिरातीत नमुद केल्यानुसार किमान ४५% टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेले असल्याने (सोबत लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणपत्रकाची प्रत) वरिल सर्व उमेदवारांची दि.१३/०८/२०१२ रोजी दु.४.०० वा. तोंडी परीक्षा (मुलाखत) मा.आयुक्त यांचे दालनात घेण्यात आलेली आहे. सदर मुलाखतीसाठी निवड समितीचे सदस्य खालील प्रमाणे हजर होते.

१. मा. विशेष समाज कल्याण अधिकारी
२. मा. सहा. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
३. मा. उपायुक्त (सा), अहमदनगर महानगरपालिका
४. मा. मुख्य लेखापरिक्षक, अहमदनगर यांचे प्रतिनिधी
५. मा. प्र.वैद्यकीय आरोग्य अधिकारी (विभाग प्रमुख), अहमदनगर महानगर पालिका

सदर बैठकीत उपरोक्त चार उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेले असून सोबत लेखी व तोंडी परीक्षेचे गुणपत्रक जोडलेले आहे. गुणपत्रक पाहता वैद्यकीय अधिकारी (अनुसूचित जमाती) या पदासाठी डॉ. चव्हाण दिपमाला बापुजी (तुपे) यांनी सर्वाधिक एकूण १७२.२० इतके गुण प्राप्त केलेले असल्याने त्यांची निवड करणे संयुक्तिक आहे. तसेच डॉ. सरपते सचिन अर्जुन यांना १४९ इतके गुण मिळालेले असल्याने त्यांची प्रतिक्षायादी वर निवड करणे संयुक्तिक होईल. तसेच वैद्यकीय अधिकारी (अपंग) या पदासाठी डॉ. दळवी गिरीश नानासाहेब हे एकमेव अपंग उमेदवार असुन त्यांनी एकूण गुण १२०.४० प्राप्त केलेले असल्याने त्यांची निवड करणे संयुक्तिक आहे, सदर पदासाठी इतर उमेदवार नसल्याने प्रतिक्षा यादी राहणार नाही.

तरी वैद्यकीय अधिकारी (अनुसूचित जमाती) या पदासाठी डॉ. चव्हाण दिपमाला बापुजी यांची व प्रतिक्षा यादीवर डॉ. सरपते सचिन अर्जुन यांची तर वैद्यकीय अधिकारी (अपंग) या पदासाठी डॉ. दळवी गिरीश नानासाहेब यांची निवड करणेस मान्यता मिळावी, तसेच सदर उमेदवारांची नांवे मनपाच्या नोटीस बोर्डावर डकविणेस मान्यता मिळावी हि विनंती.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्य सबब आदेशार्थ.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे उमेदवारांचा गुणतक्ता माहितीस्तव व "अ" प्रमाणे अनुसूचित जमाती साठीच्या वै.अ.पदी निवड झालेल्या व प्रतिक्षा सूचीवरील उमेदवार यादी तसेच "ब" प्रमाणे अपंगासाठी राखीव वै.अ.पदी निवड झालेल्या उमेदवाराची नावे / यादी मान्यतेस्तव व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर दि.२१-०८-२०१२ रोजी फेर सादर रिपोर्ट --

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर की, वैद्यकीय अधिकारी २ पदे (अनु.जमाती १ पद व अपंग १ पद) भरणेबाबत दै. पुढारी या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्दीस देऊन तसेच मा.सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, अहमदनगर यांचेकडून पात्र उमेदवारांच्या याद्या मागवून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा स.११.०० वा. ठेवण्यात आलेली होती. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची दि.१३/०८/२०१२ रोजी दु.४.०० वा. तोंडी परीक्षा (मुलाखत) मा.आयुक्त यांचे दालनात घेण्यात आली. मा.निवड समितीने उमेदवारांच्या मुलाखती घेऊन सदर पदांवर खालील पात्र उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी केलेली आहे.

| अ. नं. | पदाचे नांव व संवर्ग | उमेदवाराचे नांव |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (अनुसूचित जमाती) | डॉ. चव्हाण दिपमाला बापुजी |
| | | प्रतिक्षा यादी |
| | | डॉ. सरपते सचिन अर्जुन |
| २ | वैद्यकीय अधिकारी (अपंग) | डॉ. दळवी गिरीश नानासाहेब |
| | | प्रतिक्षा यादी |
| | | निरंक |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल नियम ५३ (१) मध्ये "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा महानगरपालिकेमध्ये निहित असेल." असे नमुद केलेले आहे.

वैद्यकीय अधिकारी या पदाची मंजुर वेतनश्रेणी ५ व्या वेतन आयोगानुसार रु.८०००-१३५०० समकक्ष ६ व्या वेतन आयोगानुसार ९३००-३४८०० ग्रेड पे-५४००/- अशी असुन सहाय्यक आयुक्त या पदाची मंजुर वेतनश्रेणी ५ व्या वेतन आयोगानुसार रु.७४००-११५०० समकक्ष ६ व्या वेतन आयोगानुसार ९३००-३४८०० ग्रेड पे-४६००/- अशी आहे. वैद्यकीय अधिकारी या पदाची वेतनश्रेणी सहाय्यक आयुक्त या पदाच्या वेतनश्रेणी पेक्षा अधिक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल नियम ५३ (१) नुसार मा.निवड समितीने निवड केलेल्या वरील उमेदवारांना नेमणूक देणेबाबतच्या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी घेणे क्रमप्राप्त असल्याने अंतिम मंजुरीसाठी महासभेपुढे सादर करणे कामी मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तथापि आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे वैद्यकीय अधिकारी नियुक्तीचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरीस्तव ठेवणे योग्य तथापि मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेनुसार मान्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे प्रस्ताव ठेवा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.महापौर सो, मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), सहाय्यक आयुक्त यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** आरोग्य कर्मचारी कमी आहेत ते वाढविण्यांत यावेत. प्रस्ताव मंजूर करावा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** विषयाला मंजूरी देण्यांत यावी.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट नुसार मागासवर्गीय अनुशेषांतर्गत व अपंग अनुशेषांतर्गत वैद्यकीय अधिकारी दोन रिक्त पदे एकत्रित वेतनावर भरण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिलीप नानाभाऊ सातपुते

अनुमोदक : मा.सौ.संगिता रत्नाकर खरमाळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २०** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** नविन प्रशासकीय इमारतीतील सभागृहास **" राजमाता जिजाऊ सभागृह "** असे नांव देणे बाबत मा.श्री.दिलीप सातपुते यांची दिनांक १०/०५/२०१२, मा.श्री.शिवाजी बाळासाहेब लोंढे यांची दिनांक ०९/०७/२०१२ व मा.श्री.संभाजी अशोकराव कदम यांची दिनांक ०९/०७/२०१२ रोजीच्या याद्या व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकूर :-**

संदर्भ- १. मा. नगरसेवक श्री. दिलीप सातपुते यांची दि.१०/०५/२०१२ ची यादी
२. मा.नगरसेवक श्री. शिवाजी बाळासाहेब लोंढे यांची दि.९/७/२०१२ ची यादी
३. मा. नगरसेवक श्री. संभाजी अशोकराव कदम यांची दि.९/७/२०१२ ची यादी

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाउ्र यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रप्रेम, हिंदु संस्कृती, पुराण, रामायण, महाभारत यामधील मानवता, बंधूता, सामाजिक एकोपा याची शिकवण देवून राजा कसा आसावा याचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने घालून दिला. राजमाता जिजाउ्र च्या शिकवणुकीमुळे एक नविन विचार घेवून शिवरायांनी स्वराज्य उभे केले. अशा या महान व्यक्तीमत्वाचे कार्य सदैव स्मरणात राहण्याच्या दृष्टीने तसेच त्यांच्या विचारांची, कार्याची आठवण सातत्याने सर्वाना होत राहवी याकरीता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीतील सभागृहास **"राजमाता जिजाउ्र सभागृह"** असे नांव देणेबाबत मा. नगरसेवक श्री. दिलीप सातपुते , श्री. शिवाजी बाळासाहेब लोंढे , श्री. संभाजी अशोकराव कदम यांनी यादी देवुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे घेण्यात यावा बाबत मा. महापौर, यांचेकडेस विनंती केली आहे. सदर सभागृहास यापुर्वी नांव देणेबाबत तत्कालीन नगरपालिका अथवा महानगरपालिकेचा ठराव झालेला नाही.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस अथवा मैदानास नांव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा. महासभेस आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभाकडे पाठविणेकरिता रिपोर्ट मंजुरीस सादर.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये नविन प्रशासकीय इमारतीतील सभागृहास "राजमाता जिजाउ्र सभागृह" असे नांव देणेबाबतचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविणे बाबत मान्येतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे सदरील विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा.) , शहर अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

मा.श्री.सातपुते दिलीप :- विषय मंजूर करावा.

मा.श्री.संभाजी कदम :- विषय मंजूर करावा.

--*--

**ठराव :-**

सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार ठरविणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीतील सभागृहास **" राजमाता जिजाऊ सभागृह "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाऊ

अनुमोदक : मा.श्री. कदम संभाजी अशोकराव.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २१** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर शहरातील आगरकर मळा सर्व्हे नंबर ७६/२/अ-१ चाहुराणा बुद्रुक येथील होणा-या उद्यानास **"स्व.मिनाताई ठाकरे उद्यान"** असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेवक श्री.दिलीप सातपुते, श्री.नितीन जगताप, श्री.संभाजी कदम यांचे दिनांक ०६/०७/२०१२ व ०९/०७/२०१२ रोजीच्या पत्रानुसार ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** १) मा.नगरसेवक श्री.दिलीप सातपुते यांचे दिनांक ०६/०७/२०१२ चे पत्र.
२) मा.नगरसेवक श्री. नितीन जगताप यांचे दिनांक ०६/०७/२०१२ चे पत्र.
३) मा.नगरसेवक श्री. संभाजी कदम यांचे दिनांक ०९/०७/२०१२ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, नगर शहरातील आगरकर मळा सर्व्हे नंबर ७६/२/अ-१ चाहुराणा बुद्रुक येथील जागा उद्यान प्रयोजनासाठी आहे असा अभिप्राय मा.नगररचनाकार यांचा असल्याने सदरच्या जागेत उद्यान विकसीत करुन त्यामध्ये कारंजे शोभिवंत झाडे, जॉगींग ट्रॅक, लॉन, लहान मुलांना खेळण्यासाठी खेळण्या इ. बाबत प्रस्ताव बनविणेची कार्यवाही चालु आहे. सदर जागेत होणा-या उद्यानास राजकीय पक्ष शिवसेनेचे संस्थापक मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी स्व.मिनाताई ठाकरे उद्यान असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेवक श्री.दिलीप सातपुते, श्री.नितीन जगताप, श्री.संभाजी कदम यांनी संदर्भीय पत्रान्वये मागणी केलेली आहे. सद्यस्थितीमध्ये सदर जागा टी.डी.आर.मार्फत हस्तांतरीत झालेली व संरक्षक भिंत बांधलेली मोकळी जागा आहे .सदर जागा महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ५४ मध्ये आगरकर मळा येथे रेल्वे संरक्षक भिंतीलगत आहे. तसेच या अगोदर बांधकाम विभागामार्फत सदर जागेसाठी कोणताही नामकरणाचा प्रस्ताव तयार करणेत आलेला नाही.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास चौकास अथवा इमारतीस नाव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस असल्याने नगर शहरातील आगरकर मळा सर्व्हे नंबर ७६/२/अ-१ चाहुराणा बुद्रुक येथील होणा-या उद्यानास स्व.मिनाताई ठाकरे उद्यान असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन मंजूरीसाठी मा.महासभेकडे पाठविणे करीता रिपोर्ट मंजुरीस सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये सदर प्रस्तावास मा.नगररचना विभाग अभिप्रायासह ठेवा.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, जा.क्र.टि.पी. दिनांक १३/०७/२०१२ अन्वये आगरकर मळा स.नं.७६/२/अ-१ चाहु.बु.ा येथे होणा-या उद्यानास स्व.मिनाताई ठाकरे उद्यान असे नाव देणे बाबत.

विषयांकित उद्यानास नांवे देणे बाबतचा विषय मा.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करणे योग्य होईल.

यावर कनिष्ठ अभियंता यांचा प्रस्ताव की, मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार नामकरणाचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणेस रिपोर्ट स.सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, नस्ती दाखल क्रमांक ४०७ दिनांक २१/०७/२०१२ अन्वये प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सा्ो यांचा अभिप्राय की, नस्ती दाखल क्रमांक ६१५ दिनांक ३१/०७/२०१२ अन्वये मान्य.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सा्ो, उपायुक्त (सा), नगररचनाकार, शहर अभियंता, कनिष्ठ अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

विषय पत्रिकेतील २१ ते २६ विषयास मान्यता देण्याबाबत सभागृहामध्ये मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.नितीन जगताप, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, सभापती स्थायी समिती, मा.श्री.अशोक किसन बडे सभागृह नेता यांनी सभागृहात उभे राहुन एकत्रितरित्या मागणी केली.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्टनुसार ठरविणेत येते की, अहमदनगर शहरातील आगरकर मळा सर्व्हे नंबर ७६/२/अ-१ चाहुराणा बुद्रुक येथील होणा-या उद्यानास **" स्व.मिनाताई ठाकरे उद्यान "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाऊ

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २२** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील आगरकर मळा एकता कॉलनीतील चाहुराणा बु.सर्व्हे नंबर ७७/१ मधील सांस्कृतिक भवनास **"सुर्यभान वहाडणे पाटील"** सभागृह तसेच उद्यानास **" प्रमोद महाजन उद्यान"** व वाचनालयास **"श्री गुरु सार्वजनिक वाचनालय"** असे नाव देणे बाबत मा.श्री.सचिन सुभाषचंद्र पारखी यांचे दिनांक ०७/०३/२०१२ रोजीची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ-श्री.सचिन सुभाषचंद्र पारखी,नगरसेवक,अ.नगर म.न.पा.यांचे पत्र दि.७/३/२०१२

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, संदर्भिय पत्रानुसार संबंधित नगरसेवक सोबत कामाची पाहणी केली असता सदरचे सांस्कृतिक भवन हे प्रभाग क्रमांक ५४ मधील आगरकर मळा मधील एकता कॉलनीतील चाहुराणा बु. सर्व्हे नं.७७/१ मधील खुल्या जागेत आहे. सदर खुल्या जागेत सांस्कृतिक भवन व वाचनालय अशा दोन वास्तू व खुल्या जागेमध्ये जॉगींग ट्रॅकसह उद्यान इत्यादी विकास कामे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत पुर्णत्वाचे मार्गावर आहे.

सदर ठिकाणी संदर्भिय पत्रान्वये श्री. सचिन पारखी यांनी खालील ३ मागणी केलेली आहे.

१] सांस्कृतिक भवनास "सुर्यभान वहाडणे पाटील" सभागृह असे नाव देणे

२] खुल्या जागेत विकसित केलेल्या उद्यानास "प्रमोद महाजन उद्यान" असे नाव देणे

३] वाचनालयास "श्री गुरू सार्वजनिक वाचनालय" असे नाव देणे

सदरची वरीलप्रमाणे नावे देण्यांत येणा-य वास्तूंचे व बगिचाचे काम मा. शासनाच्या सा.बां. विभाग मधुन पुर्णत्वाचे मार्गावर आहे. त्याकरिता वरीलप्रमाणे नामकरण करणेचा निर्णय घेणेसाठी मा. नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन रिपोर्ट निर्णयास्तव मा. महासभेकडे पाठविणेस रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचना विभाग अहवालास्तव सादर.

यावर मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय की, सदर प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्याचे प्रयोजन समजत नाही. सबब विना अभिप्राय परत पाठवित आहे.

यावर मा.फेरसादर रिपोर्ट की,

सदरचा विषयांकित प्रस्ताव सांस्कृतिक भवनास नाव देणे बाबतचा आहे. सदरचा विषयास मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे परंतु तत्पुर्वी विषयांकित सांस्कृतिक भवन हे मंजूर रेखांकनामधील व चाहुराणा बु ।। स.नं.७७/१ मधील खुल्या जागा असल्याने व या अगोदर सदर सांस्कृतिक भवनास कोणतेही नाव न दिल्याने मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय आवश्यक आहे. त्यावर मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणेस्तव व निर्णयास्तव मा.महासभेकडे पाठविणेस रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये कृपया कार्यवाहीस्तव सादर.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, बांधकाम विभागांच्या प्रस्तावा प्रमाणे सांस्कृतिक भवनास नाव देणे बाबतचा विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर करणे योग्य होईल.

यावर मा.फेरसादर रिपोर्ट की,

मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार प्रस्ताव निर्णयासाठी मा.महासभेकडे पाठविणेस्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार विषय मा.महासभेपुढे विषय ठेवणेस्तव मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर सो यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.महापौर, मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), शहर अभियंता, नगररचनाकार, उप अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

विषय पत्रिकेतील २१ ते २६ विषयास मान्यता देण्याबाबत सभागृहामध्ये मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.नितीन जगताप, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, सभापती स्थायी समिती, मा.श्री.अशोक किसन बडे सभागृह नेता यांनी सभागृहात उभे राहुन एकत्रितरित्या मागणी केली.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्टनुसार ठरविणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील आगरकर मळा एकता कॉलनीतील चाहुराणा बु.सर्व्हे नंबर ७७/१ मधील सांस्कृतिक भवनास **"सुर्यभान वहाडणे पाटील"** सभागृह तसेच उद्यानास **" प्रमोद महाजन उद्यान"** व वाचनालयास **"श्री गुरु सार्वजनिक वाचनालय"** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाऊ

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २३** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव आदर्शनगर मधील ओपन स्पेसमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहाचे **" शहीद जवान मेजर जावेद बकाली सभागृह "** असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेवक श्री.शिवाजी लोंढे यांची दिनांक ०४/०४/२०१२ ची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ- मा. नगरसेवक श्री. शिवाजी लोंढे यांचे दि.०४/०४/२०१२ चे पत्र सार्व.बांधकाम विभाग प्राप्त दि.०९/०४/२०१२

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, प्रभाग क्रमांक ६३ मध्ये आदर्शनगर भागातील म.न.पा.च्या खुल्या जागेत केडगाव स.नं. २०८ पार्ट व २०९ मधील खुल्या भुखंडावर मा.नगरसेवक यांचे नगरसेवक निधीतुन सभागृह उभारण्यात आलेले असुन सदर सभागृहास "शहीद जवान मेजर जावेद बकाली सभागृह" असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेवक श्री. शिवाजी लोंढे यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे. दिवंगत व्यक्ती ही केडगांव येथील रहिवासी होती व देशासाठी अतिरेक्यांशी लढताना काश्मीर खो-यात त्यांना वीर मरण आले होते त्यामुळे त्यांच्या स्मृती जपण्यासाठी मा. नगरसेवक यांनी नगरसेवक निधीतुन उभारलेल्या वास्तुस "शहीद जवान मेजर जावेद बकाली सभागृह" वरील नामकरण करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच यापुर्वी सदर सभागृह कोणतेही नाव दिलेले नाही.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा. महासभेस असल्याने **" शहीद जवान मेजर जावेद बकाली सभागृह"** असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन मा. महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

--**--

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचना विभाग.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, विषयांकित केडगांव आदर्शनगर येथील ओपन स्पेस मध्ये बांधण्यात आलेल्या सभागृहाचे नामकरण करणेचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविण्यास या विभागाची हरकत नाही.

यावर मा.फेरसादर रिपोर्ट की, यापुर्वी सदर सभागृहास कोणतेही नाव दिले नसल्याने व मा.नगररचना यांचे अहवालानुसार नामकरणाचा प्रस्ताव मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस्तव सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचना विभागाचे अहवालान्वये सदर बाबत निर्णयास्तव मा.महासभेसमोर निर्णयास्तव पाठविण्यास आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालानुसारचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपायुक्त (सा), नगररचनाकार, शहरअभियंता, उप अभियंता यांचे प्रस्तावासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

विषय पत्रिकेतील २१ ते २६ विषयास मान्यता देण्याबाबत सभागृहामध्ये मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.नितीन जगताप, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, सभापती स्थायी समिती, मा.श्री.अशोक किसन बडे सभागृह नेता यांनी सभागृहात उभे राहुन एकत्रितरित्या मागणी केली. त्याचवेळी मा.श्री.शिवाजी लोंढे नगरसेवक यांनी सदर नामकरणा मधील जवान शब्द कमी करणे बाबत मागणीचे निवेदन दिले.

--*--

**ठराव :-**

ठरविणेत येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव आदर्शनगर मधील ओपन स्पेसमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहाचे **" शहीद मेजर जावेद बकाली सभागृह "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाऊ

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २४** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव गजानननगर लोंढे मळा मधील ओपन स्पेस मध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहाचे **" शाहू फुले आंबेडकर सभागृह "** असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेवक श्री.शिवाजी लोंढे यांची दिनांक ०४/०४/२०१२ रोजीची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ- मा. नगरसेवक श्री. शिवाजी लोंढे यांचे दि.०४/०४/२०१२ चे पत्र सार्व.बांधकाम विभाग प्राप्त दि.०९/०४/२०१२

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, प्रभाग क्रमांक ६३ मध्ये गजानननगर लोंढे मळा येथील म.न.पा.च्या खुल्या जागेत केडगांव स.नं.२८४/२अ मधील खुल्या भुखंडावर मा.नगरसेवक यांचे नगरसेवक निधीतुन सभागृह उभारण्यात आलेले असुन सदर सभागृहास "शाहु फुले आंबेडकर सभागृह" असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेवक श्री. शिवाजी लोंढे यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत वरील तिन्ही महापुरूषांचा सिंहाचा वाटा असुन त्यांचे नित्यनियमाने दररोज जनतेस स्मरण व्हावे या उद्देशाने "शाहु फुले आंबेडकर सभागृह" असे नामकरण करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच सदर सभागृहास या अगोदर कोणतेही नामकरण केलेले नाही.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा. महासभेस असल्याने प्रभाग क्र.६३ मध्ये गजानननगर लोंढे मळा मधील खुल्या भुखंडामध्ये बांधलेल्या सभागृहास **"शाहु फुले आंबेडकर सभागृह"** असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा. नगररचना विभाग

यावर मा. नगररचनाकार यांचा अभिप्राय की, विषयांकित केडगांव गजानननगर लोंढे मळा येथील ओपन स्पेस मध्ये बांधण्यात आलेल्या सभागृहाचे नामकरण करणेचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविण्यास या विभागाची हरकत नाही.

यावर कनिष्ठ अभियंता यांचा अभिप्राय फेर सादर की, मा.नगररचनाकार यांचे अहवालानुसार व यापुर्वी सदर ठिकाणी नाव दिलेले नसले नामकरणाचा प्रस्ताव निर्णयासाठी मा. महासभेपुढे पाठविणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचना विभागाच्या अहवालान्वये ओपन स्पेस मधील सभागृहाचे "शाहू फुल आंबडेकर सभागृह" नाव देणे बाबतचा विषय मा. महासभे समोर पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा.)यांचा अभिप्राय की, अहवालानुसारचा प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा.), शहर अभियंता , नगररचनाकार, उप अभियंता यांचे अभिप्रायासह मा. महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

विषय पत्रिकेतील २१ ते २६ विषयास मान्यता देण्याबाबत सभागृहामध्ये मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.नितीन जगताप, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, सभापती स्थायी समिती, मा.श्री.अशोक किसन बडे सभागृह नेता यांनी सभागृहात उभे राहुन एकत्रितरित्या मागणी केली.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्टनुसार ठरविणेत येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव गजाननननगर लोंढे मळा मधील ओपन स्पेस मध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहाचे **" शाहू फुले आंबेडकर सभागृह "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाऊ

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : २५** **दिनांक : १४ / ०९ /२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेचे ठेकेदार श्री.शेख महेबुब अमीर यांची तीन वर्षाची टेंडरची मुदत संपल्याने त्यांनी भरलेले सुरक्षा अनामत रक्कम रु.१०,०००/- परत मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट आरोग्य विभागाकडुन देण्यांत येतो की, श्री.शेख महेबुब अमीर यांनी आरोग्य जा.क्र.१५०६ दिनांक २०/१२/२००८ नुसार दिलेल्या कार्यारंभ आदेशा प्रमाणे दिनांक २२/१२/२००८ पासुन पुढील तीन वर्षाकरीता दिनांक २२/१२/२०११ अखेर बेवारस प्रेत दफन विधीचे काम विना तक्रार पुर्ण करुन व मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचे आदेशाने दिनांक २३/१२/२०११ ते ०६/०६/२०१२ अखेर मुदतवाढ चे काम व्यवस्थित केले आहे.

तरी नेमुन दिलेले कामाचा कालावधी पुर्ण झाला आहे. करीता खालील प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार मात्र) अहमदनगर महानगरपालिकेचे ठेकेदार श्री.शेख महेबुब अमीर यांना परत देणेस मंजूरी मिळावी हि विनंती.

सविनय सादर.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | सुरक्षा अनामत रक्कम | सामान्य पावती क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.शेख महेबुब अमीर | १०,०००/- | १०२९६९<br>दिनांक ११/१२/२००८ |

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम रुपये १०,०००/- परत करणेकरीता मा.महासभेची मान्यता घेणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, यथा प्रस्तावित.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, उपायुक्त कार्यालय नस्ती क्रमांक ४१६ दिनांक २०/०७/२०१२, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांचा अभिप्राय की, आयुक्त कार्यालय नस्ती क्रमांक ६२१ दिनांक २३/०७/२०१२, मान्य.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट  मा.आयुक्त साो, उपायुक्त (सा), मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकारी  यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :-

विषय पत्रिकेतील २१ ते २६ विषयास मान्यता देण्याबाबत सभागृहामध्ये मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.नितीन जगताप, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, सभापती स्थायी समिती, मा.श्री.अशोक किसन बडे सभागृह नेता यांनी सभागृहात उभे राहुन एकत्रितरित्या  मागणी केली.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्टनुसार ठेकेदार श्री.शेख महेबुब अमीर यांची तीन वर्षाची  टेंडरची मुदत संपल्याने त्यांनी भरलेले सुरक्षा अनामत रक्कम रु.१०,०००/- परत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाऊ

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.